# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१५ – १६

## **खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ**

प्रभात शुक्रवार, दि. ८ जानेवारी २०१६ 09



राजगुरुनगर : राजगुरू महाविद्यालयाची विस्तारित नूतन इमारत.

# राजगुरू महाविद्यालयाच्या नूतन इमारतीचे आज उद्घाटन

राजगुरुनगर, दि. ७ (प्रतिनिधी)- खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ, हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विस्तारित नूतन इमारतीचे उद्घाटन शुक्रवारी (दि. ८) माजी केंद्रीय कृषी मंत्री, शरद पवार यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील यांनी दिली.

यावेळी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले मुलींच्या वसतिगृह नामकरण, संस्थेचे मानद सचिव राम कांडगे लिखित क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले ग्रंथ प्रकाशन समारंभ यावेळी पवार यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माजी विधानसभा अध्यक्ष दिलीप वळसेपाटील भूषविणार आहेत. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून खासदार शिवाजी आढळराव पाटील, आमदार सुरेश गोरे, माजी आमदार दिलीप मोहिते पाटील, माजी प्राचार्य डॉ.जे.डी . टाकळकर यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमासाठी सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव राम कांडगे यांनी केले आहे.

सकाळ
शनिवार,
९ जानेवारी २०१६
३

# नव्या पिढीला परिपूर्ण ज्ञान देण्याची गरज

## ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे प्रतिपादन; हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या इमारतीचे उद्‌घाटन

राजगुरुनगर, ता. ८ : माहिती तंत्रज्ञानामुळे आणि माध्यमांच्या प्रसारामुळे जीवनामध्ये प्रचंड स्पर्धा निर्माण झाली आहे. त्यात टिकून राहण्यासाठी नव्या पिढीला परिपूर्ण ज्ञान देऊन त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करण्याची आवश्यकता आहे. ग्रामीण भागातील शिक्षणसंस्थांनी ही जबाबदारी घेतली पाहिजे, असे आवाहन माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी राजगुरुनगर (ता. खेड) येथे केले.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विस्तारित इमारतीचे उद्‌घाटन, सावित्रीबाई फुले कन्या वसतिगृहाचे नामकरण व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या चरित्राचे प्रकाशन पवार यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विधानसभेचे माजी अध्यक्ष दिलीप वळसे पाटील होते. या वेळी खासदार शिवाजीराव



राजगुरुनगर (ता. खेड) : खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील विस्तारित इमारतीचे उद्‌घाटन व सावित्रीबाई फुले वसतिगृहाचे नामकरण कोनशिलेच्या अनावरण प्रसंगी माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार.

आढळराव पाटील, आमदार सुरेश गोरे, माजी आमदार दिलीप मोहिते, सूर्यकांत पलांडे, दिलीप ढमढेरे, पोपटराव गावडे, विजय कोलते, सभापती सुरेश शिंदे, बाजार समितीचे सभापती विलास कातोरे, नगराध्यक्ष बापूसाहेब थिगळे, संस्थेचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, माजी प्राचार्य डॉ. जे. डी. टाकळकर उपस्थित होते.

पवार म्हणाले, "खेड तालुक्याच्या विकासात सर्वच लोकप्रतिनिधींचे योगदान आहे. चासकमान व भामा-आसखेड धरणांमुळे जलसिंचन वाढले आणि शेती बागायती झाली. कारखानदारी वाढली; परंतु या कारखानदारीचे जनतेच्या विकासात काय फायदा झाला? ज्या सामान्य शेतकऱ्यांनी जमिनी दिल्या त्यांची मुले कुठे आहेत? त्यांना नोकऱ्या देण्यासाठी कारखानदारांनी निश्चित धोरण ठरवायला हवे. औद्योगिकीकरणाचा तालुक्याच्या विकासासाठी उपयोग झाला पाहिजे. स्व. साहेबराव बुट्टे पाटील यांनी दूरदृष्टी ठेवून महाविद्यालय सुरू केले आणि शिक्षण क्षेत्रामध्ये एक दीपस्तंभ निर्माण केला." या वेळी संस्थेचे सचिव ॲड. राम कांडगे यांनी लिहिलेल्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या चरित्राचे प्रकाशन पवार यांच्या हस्ते झाले. ॲड. बुट्टे पाटील यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेतला. डॉ. अनिल खिंवसरा यां[illegible] सूत्रसंचालन केले. प्राचार्य डॉ. बी. पाटील यांनी आभार मान[illegible]

### शिष्यवृत्तीसाठी ५० लाखांची ठेव

महाविद्यालयातील गरीब व गरजू विद्यार्थी व विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती मिळावी, यासाठी शरद पवार यांनी या वेळी ५० लाख रुपयांची ठेव जाहीर केली. या ठेवीच्या व्याजातून गरीब व आदिवासी आठ विद्यार्थी व विद्यार्थिनींना प्रत्येकी २५ हजार रुपये शिष्यवृत्ती देण्यात यावी, असे त्यांनी सांगितले. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले व शारदाबाई पवार यांच्या नावाने मुलींना तर दत्तात्रेय वळसे पाटील व साहेबराव बुट्टे पाटील यांच्या नावाने मुलांना शिष्यवृत्ती दिली जावी, असे ते म्हणाले.

# 'प्रभात' न्याहाळताना शरद पवार...



राजगुरूनगर : खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विस्तारित नूतन इमारतीचे उद्घाटन कार्यक्रमाप्रसंगी व्यासपीठावर दैनिक 'प्रभात'मधील वृत्ताची चर्चा करताना माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार आणि मंडळाचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टे-पाटील. (छाया : राजेंद्र मांजरे)

(वृत्त आतील पानात पहा)

प्रभात शनिवार, दि. ९ जानेवारी २०१६



खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विस्तारित नूतन इमारतीचे उद्घाटन प्रसंगी विशाल जनसमुदायास संबोधित करताना मंडळाचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील.

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख